# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक 10/09/2023 (रविवार) सकाळ**

---

## गांजा तस्करी करणारे आरोपी १८ किलो ७०० ग्रॅम गांजासह गजाआड
## पोलीस स्टेशन उमरेड यांची कारवाई

आज दिनांक १०/०९/२०२३ रोजी पो.स्टे. उमरेड येथील गुन्हे प्रकटीकरण पथकास खात्रीशिर गुप्त माहीती मिळाली कि, दोन ईसम हे बायपास चौक परीसरात दोन कथ्या रंगाच्या बॅगमध्ये गांजा पदार्थ घेवून बाळगून संशयास्पद रित्या फिरत आहे. अशा सूचनेवरून बायपास चौक व आजुबाजुच्या परीसरात दिलेल्या वर्णनाच्या इसमांचा शोध घेतला असता मोहपा रोड उमरेड येथे दोन इसम कथ्या रंगाच्या बॅगसह संशयास्पदरित्या मिळुन आले. सदर दोन्ही ईसमांना ताब्यात घेवुन त्यांचे नाव विचारले असता त्यांनी आपले नाव १) रौनक देवनाथ शिंपी वय १९ वर्ष, रा. येरकड ता. धानोरा जि. गडचिरोली २) आदित्य विकास वाघमारे वय २२ वर्ष रा. येरकड ता. धानोरा जि. गडचिरोली असे सांगीतले. दोन्ही ईसमांच्या ताब्यात असलेल्या दोन कथ्या रंगाच्या बॅग तपासले असता त्यामध्ये एकून १८ किलो ७०० ग्रॅम गांजा अंदाजे किंमती ३,७४,०००/— रुपयाचा मुद्देमाल मिळुन आल्याने दोन्ही ईसमाकडून सदर मुददेमाल जप्ती पंचनाम्या प्रमाणे पंचासमक्ष एन. डी. पी. एस. कायदयातील सर्व आवश्यक तरतुदीचे पालन करून जप्ती पंचनाम्या नुसार जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपीताविरुद्ध गुन्हा दाखल करून तपासात घेण्यात आला.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक साहेब हर्ष पोद्दार, अपर पोलीस अधिक्षक डॉ. सदिप पखाले, उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग उमरेड श्रि. राजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक प्रमोद घोंगे सोबत पोउपनि दिनेश खोटेले, पोहवा प्रदिप चवरे, पोना राधेशाम कांबळे, पंकज बटटे, पोना रमेश खरकाटे, पोशि गोवर्धन सहारे पोशि भागवत गुटटे सर्व पो.स्टे. उमरेड यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

## कोळसा चोरी

पो.स्टे. कन्हान :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील गोंडेगाव येथे दिनांक ०९/०९/२०२३ चे ००.३० वा. ते ०१. ०० वा. सुमारास फिर्यादी हे स्टाफसह रात्र गस्त करीत असतांना चेकिंग दरम्यान गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की पांढऱ्या रंगाच्या जेनान पिकअप वाहनाने चोरी केलेला कोळसा घेउन अवैधरित्या वाहतुक करीत आहे. अशा खबरेवरून पोलीस स्टेशन कन्हान येथील स्टाफ यांनी गोंडेगाव शितलामाता मंदीरचे रस्त्यात नाकाबंदी केली असता एक पांढऱ्या रंगाचा जेनान पिकअप गावातुन बाहेर येताना दिसला. सदर वाहनाची पाहणी केली असता ताडपत्रीचे खाली दगडी कोळसा भरलेला दिसुन आला. **सदरचे आरोपी नामे— १) संदीप शिवप्रसाद पटेल, वय ३१ वर्ष, रा. सालई खुर्द ता. मोहाडी जि. भंडारा २) अश्विन गेंदलाल वाडीवे, वय २६ वर्ष, ३) लहु झोलबा सहारे वय २९ वर्ष रा. दोन्ही रा. महादुला रामटेक** यांना कोळसाबाबत विचारपुस केली असता त्यांनी सांगीतले की ४) शैलेश कडबे वय ३७ वर्ष रा. पवनी देवलापार याचे मदतीने डंपींग यार्ड गोंडेगाव येथुन कोळसा चोरला. असे सदर आरोपीचे ताब्यातुन जेनान गाडी

क्र एम. एच.– ४९/डी–०९८८ किंमती ४०००००/– व दगडी कोळसा अंदाजे ३ टन किंमती १२०००/– रू. असा एकुण ४१२०००/– रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे– पोना महेंद्र निलकंठ जळीतकर ब.नं. १०८८ पो. स्टे कन्हान यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सफौ/६४३ सदाशिव काटे मो. नं. ९०११३२६७९३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**